www.ecourtsindia.com

सं. फौ. ख. क्र. ५३९/२०१९ निशाणी २०

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – शाम शंकर भेंडे

वय – ३४ वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी

पत्ता – अंदुरा, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. दि. २५.०४.२०१९ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजताच्या दरम्यान मी अंदुरा येथुन कासली येथे मोटरसायकलने जात होतो. त्यावेळी माझ्या सोबत माझी पत्नी व माझा मुलगा असे होते. मी ज्या मोटरसायकलने जात होतो त्याचा क्र. एम.एच. ३० बी. १२५७ असा होता. ती गाडी माझे सहकारी नंदु बोरडे यांची होती. मी आगर गावातुन जात असतांना समोरुन भरधाव वेगाने एक ट्रॅक्टर येत होता त्याचा क्र. एम.एच. ३० ए.बी. ९२३६ आणि ट्रॉली क्र. एम.एच. ३० ए.एन ४०५९ असा होता. ट्रॅक्टर येत असल्याने मी माझी गाडी रस्त्याच्या कडेला थांबविली. ट्रॅक्टर भरधाव वेगात होता त्याचा धक्का माझ्या पत्नीला लागला त्यामुळे ती खाली पडली व आम्ही आमच्या गाडीला व आम्हाला पडण्यापासुन सावरले. माझी पत्नी खाली पडल्यानंतर मी जोरात ओरडलो, पण ट्रॅक्टर जोरात निघुन गेला. माझा आरडाओरडा ऐकुन आगर येथील गावातील लोक जमा झाले व त्यांच्या मदतीने मी माझ्या पत्नीला ऑटोने आगर येथील सरकारी दवाखान्यात नेले. आगर येथील सरकारी दवाखान्यात नेल्यानंतर माझ्या पत्नीचा श्वास जोरजोराने चालु होता व ती म्हणत होती ट्रॅक्टरचे चाक माझ्या पोटावरुन गेले आहे, मला लवकर दवाखान्यात न्या. त्यानंतर डॉक्टरच्या सल्ल्याने तेथे उभी असलेली सरकारी रुग्णवाहीकेने मी माझ्या पत्नीला अकोला येथील सरकारी दवाखान्यात नेले. अकोला येथील सरकारी दवाखान्यात नेल्यानंतर डॉक्टरांनी तिची तपासणी करुन तिला मृत घोषीत केले. त्यानंतर तिचा शव एक दिवस शव विच्छेदन करिता ठेवला आणि दुसऱ्या दिवशी माझे ताब्यात दिला. दुसऱ्या दिवशी शव मिळाल्यानंतर मी तिचा अंतिम संस्कार केला. दुखःत असल्याने मी आरोपी विरुध्द तात्काळ रिपोर्ट देवु शकलो नाही. मी दि.

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK070012592019-orderno-1.pdf

०१.०५.२०१९ रोजी आरोपी विरुध्द रिपोर्ट दिला. ट्रॅक्टर चालकाने निष्काळजीपणे भरधाव वेगात ट्रॅक्टर चालवुन माझ्या पत्नीचा मृत्युस कारणीभुत झाला आहे. सदरचा अपघात सायंकाळी ०६.३० ते ०७.०० च्या दरम्यान झाला. सदरचे ट्रॅक्टर समोरुन कासलीहुन लोणाग्राकडे येत होता. मला सदरचा रिपोर्ट दाखविण्यात आला, त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. २१** देण्यात येत आहे. मला छापील प्रथम खबर दाखविण्यात आली, त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. २२** देण्यात येत आहे. अकोला येथील सरकारी दवाखान्यात नेण्यापुर्वी मी माझ्या पत्नीला अकोला येथील ओझोन हॉस्पीटल येथे नेले होते. तेथे माझ्या पत्नीची तपासणी करुन तिला मृत घोषीत केले आणि सरकारी दवाखान्यात नेण्यास सांगितले. ट्रॅक्टर चालकाचे नाव दिपक ढोरे असे होते. मी सदर इसमाला ट्रॅक्टर चालवतांना पाहिले होते. सदर इसम आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी.एस.तिडके यांचे मार्फत</u>**

२. घटनास्थळ आगर गावामधील आहे. गावामधील रस्ता अरुंद आहे. रस्त्याच्या बाजुला गावातील लोकांची घरे आहेत. त्यांनी अतिक्रमण केले आहे की नाही मला माहित नाही. त्या रस्त्याच्या दोन्ही बाजुला साधारण अर्धा कि.मी. पर्यंत घरे आहेत. सदरचा रस्ता वाकडा तिकडा आहे.

प्रश्न – त्या रस्त्याला २–३ ठिकाणी गतीरोधक आहे ?

उत्तर – मला १ गतीरोधक दिसला होता.

३. माझा मुलगा गाडीवर समोर बसलेला होता. त्याचे हातात काही नव्हते. खेळणी गाडीला बांधलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही जात असतांना आमची गाडी गतीरोधकावर उसळली त्यामुळे माझी पत्नी खाली पडली. हे म्हणणे खरे नाही की, खाली पडल्यामुळे माझ्या पत्नीच्या डोक्याला मार लागला. मी पोलीस स्टेशनला जबानी रिपोर्ट दिला होता. मी ट्रॅक्टर चालकाला ट्रॅक्टर चालवतांना पाहिले होती ही बाब पोलीसांनी विचारली नाही म्हणुन सांगितली नाही. मी रिपोर्ट देतांना ''माझी पत्नी

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK070012592019-orderno-1.pdf

पडल्यानंतर मी कल्ला केल्यामुळे लोक जमा झाली, आगर येथील सरकारी दवाखान्यात घेवुन गेल्यानंतर माझ्या पत्नीचा श्वास जोरजोराने सुरु होता, तिच्या पोटावरुन चाक गेल्याचे माझ्या पत्नीने मला सांगितले होते'' असा मजकुर सांगितला होता. या बाबी माझ्या रिपोर्ट मध्ये नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. आगर रस्त्यावर नेहमी वाहनांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीला फिट येण्याची बिमारी होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी देखील माझ्या पत्नीला फिट आली होती. फिट येतांना दातखिळी बसते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीला रस्त्यावर पडल्याने डोक्यावर मार लागल्याने व दातखिळी बसल्याने तिचा मृत्यु झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकूर मी खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आरोपी ट्रॅक्टर चालवित असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीचा मृत्यु झाल्याने नुकसान भरपाई मिळावी या करिता मी आरोपी विरुध्द खोटा खटला दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला फसविण्यासाठी मी खोटा रिपोर्ट दिलेला आहे, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.10.04 10:49:28 +0530

बाळापूर.
दि. ०३/१०/२०२४

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK070012592019-orderno-1.pdf